# महाराष्ट्र शासन

# गृह विभाग अर्थसंकल्प : २०१७-१८

## समर्थन

### अर्थसंकल्प अध्ययन केंद्र

**समर्थन**, ११५, धुरी कॉमर्स प्लाझा, वसई रोड रेल्वे स्टेशन समोर, वसई (पू),
जि. पालघर -४०१२०८, दूरध्वनी : ०२५०-२३९०१०३/४
Email: samarthanmumbai97@gmail.com
www.samarthanadvocacy.org

समर्थन

संस्थापक अध्यक्ष : **स्व. सदानंद वर्दे**

संस्थापक : **श्री. विवेक पंडित**

अध्यक्ष : **श्री. प्रविण महाजन**

उपाध्यक्ष: **श्री. आशिष कुलकर्णी**

कार्याध्यक्ष: **श्री. संतोष पाटील**

सचिव : **श्री. सुशील शुक्ल**

संपादन :
**मुक्ता भारती**

संकलन:
**रुपेश कीर** -९८९२९३९६१७
**मॅकेन्झी डाबरे** - ९६६५००६४२९

मांडणी व अक्षरजुळणी :
**प्रतिक्षा कोयंडे**

**नोंदणी क्रमांक:**
पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८९०३, मुंबई
सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई
१५६७/९६ जीबीबीएसडी

**प्रकाशक (पत्रव्यवहार):**
समर्थन – ११५- धुरी कॉमर्स प्लाझा, वसई रोड
रेल्वे स्थानकासमोर,
वसई (पू), जि. पालघर -४०१ २०८
दूरध्वनी: ०२५०-२३९०१०३/४
Email:samarthanmumbai97@gmail.com
website: www.samarthanadvocacy.org

# लोकशाही बळकट करण्याकरिता उपेक्षितांचे 'समर्थन'

## समर्थन विषयी थोडेसे

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे 'समर्थन'. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

## 'समर्थन'च्या कामाचे विविध स्तर

◊ ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.

◊ प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.

◊ प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.

◊ विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.

◊ राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.

◊ आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.

◊ ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.

◊ लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.

◊ अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

# पुस्तिका वाचण्यापूर्वी थोडेसे. . .

- ‘समर्थन’ची प्रकाशने सत्तेतील तसेच विरोधातील सन्माननीय सदस्यांना उपयुक्त व्हावीत यासाठी असतात.
- सदर माहिती पुस्तिकेचा उद्देश विधिमंडळ सभागृहांमध्ये राज्याच्या अर्थसंकल्पावर होणाऱ्या चर्चेत राज्याच्या अर्थसंकल्पातील माहिती सुलभपणे वाचता यावी आणि त्यामुळे विधिमंडळात दर्जेदार चर्चा व्हावी हा आहे.
- अर्थसंकल्प हा राज्याच्या धोरणाचा खराखुरा चेहरा असतो, प्राधान्यक्रमाचा आरसा असतो त्यामुळे अर्थसंकल्पातील तरतुदी राज्यातील दीन-दुर्बल घटकांच्या जीवनावर काय प्रभाव टाकतात यावर सभागृहात चर्चा व्हावी अशी अपेक्षा असते.
- माध्यमे जनमतावर प्रभाव टाकतात त्यामुळे धोरणकर्त्यांना त्याची दखल घ्यावी लागते. ही पुस्तिका माध्यम प्रतिनिधींनाही संदर्भ पुस्तिका ठरावी असा प्रयत्न आहे.
- सदरची माहिती अर्थसंकल्पीय प्रकाशने, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या वित्तीय अहवाल, विनियोजन लेखे, शासनाच्या विविध विभागांनी, महामंडळांनी प्रकाशित केलेले अहवाल याच माहितीवर आधारित आहे. त्यात शासना व्यतिरिक्त अन्य संस्थांची मते अगर माहिती यांचा आधार घेतलेला नाही. त्यामुळे प्रत्येक माहितीखाली त्या माहितीचा स्त्रोत दिला आहे.
- तुलनात्मक अभ्यास करता यावा म्हणून २०१०-११ पासून २०१७-१८ पर्यंत अर्थसंकल्पातील प्रत्यक्ष खर्च आणि तरतूद समाविष्ट केली आहे.
- माहिती काटेकोरपणे तपासण्यात आली आहे. तरीही काही त्रुटी राहिल्यास त्या निदर्शनास आणल्यास ऋणी राहू.
- प्रकाशन अधिक माहिती पूर्ण सुलभ आणि प्रभावी व्हावे म्हणून आपल्या सूचनांचे स्वागत आहे.
- अर्थसंकल्पविषयक अधिक माहिती जाणून घेण्याची कुणाची इच्छा असल्यास या विषयातील अनुभवी पत्रकार, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, विषयतज्ज्ञ तसेच निवृत्त सनदी अधिकारी यांचेमार्फत प्रत्यक्ष चर्चा घडवून आणण्याची जबाबदारी समर्थन स्वीकारीत आहे.


- विवेक पंडित

संस्थापक, समर्थन

९८२३१४७००३

pvivek2308@gmail.com

# गृह विभाग

## ठळक वैशिष्ट्ये :

☞ २०१५ मध्ये ४.२३ लाख दखलपात्र गुन्हे दाखल, २०१४ चे तुलनेत ९.९७टक्के वाढ.

☞ २०१५ या वर्षात भा. दं. वि. प्रमाणे २.७५ लाख व विशेष आणि स्थानिक कायद्यांप्रमाणे १.४८ लाख गुन्हे दाखल.

☞ दर ३ मिनिटास सरासरी २ दखलपात्र गुन्हे दाखल.

☞ भा.दं.वि. प्रमाणे सरासरी १ गुन्हा प्रति २ मिनिटास तर विशेष आणि स्थानिक कायद्याप्रमाणे सरासरी १ गुन्हा प्रति ४ मिनिटास दाखल.

☞ राज्याचे भा. दं. वि. गुन्ह्यांचे प्रमाण २३२.२ आहे. गुन्ह्यांचे सर्वाधिक प्रमाण अमरावती शहर या घटकामध्ये ५२२.५ (१ लाख लोकसंख्येशी)

☞ मागील वर्षापेक्षा भा. दं. वि. प्रमाणे दाखल झालेल्या गुन्ह्यांत १०.२ टक्के वाढ.

☞ एकूण भा. दं. वि. चे प्रमाण गुन्ह्यांपैकी २.० टक्के भाग अल्पवयीन गुन्ह्यांचा.

☞ एकूण भा.दं.वि.चे गुन्ह्यांपैकी ३९.४३ टक्के गुन्हे ९ मोठ्या शहरांमध्ये (आयुक्तालयांमध्ये) दाखल, त्यापैकी ३९.५६ गुन्हे एकट्या मुंबई शहरात दाखल.

☞ स्त्रियांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यांत १६.५७ टक्के वाढ. सर्वाधिक गुन्हे मुंबई शहरात (४८०३) दाखल असून संपूर्ण महाराष्ट्राचे गुन्ह्यांचे प्रमाण (दर १ लाख स्त्री लोकसंख्येस) ५४.८० तर सर्वाधिक गुन्ह्यांचे प्रमाण अमरावती येथे (१२५.९०).

☞ १८ वर्षाच्या आतील बालिकांवरील बलात्कारामध्ये २०१४ च्या तुलनेत २०१५ मध्ये ३१.४९ टक्के वाढ.

☞ स्त्रियांवरील अत्याचाराचे ९२.३ टक्के गुन्हे विविध न्यायालयांमध्ये प्रलंबित.

☞ २०१४च्या तुलनेत २०१५ मध्ये अनुसूचित जातीवरील अत्याचाराचे गुन्ह्यांमध्ये २.७१ टक्के वाढ व अनुसूचित जमातीवरील अत्याचाराचे गुन्ह्यांमध्ये ९.०३ टक्के वाढ आहे.

☞ सन २०१५ मध्ये राज्यात भा.दं.वि. गुन्ह्यांचे शाबितीचे प्रमाण ३२.९९ टक्के आहे. शाबित न झालेले गुन्हे ६७.०१ टक्के.

☞ ३१ लाख ११ हजार १४० व्यक्तींच्या (राज्याच्या लोकसंख्येच्या २.६१टक्के) भा.दं.वि. खटल्यांची सुनावणी विविध न्यायालयांसमोर प्रलंबित.

☞ सन २०१५ मध्ये कर्तव्यावर असलेल्या एकूण जखमी पोलिसांपैकी ४४.०५टक्के पोलीस बेकायदेशीर जमावाने केलेल्या हल्ल्यात जखमी.

☞ सन २०१५ मध्ये राज्यात १६९७० व्यक्तींनी आत्महत्या केल्या. १३६८५ व्यक्ती रस्त्यावरील अपघातात मृत्यू पावल्या.

☞ सन २०१५ मध्ये संगणक / सायबर गुन्ह्यांत गतवर्षीच्या तुलनेत १६.८२ टक्के वाढ झाली.

☞ राज्यात सन २०१५ मध्ये २१६५६ वाहने चोरीस गेली व त्यापैकी २४.२५टक्के वाहने मिळून आली.१६४०४ वाहने मिळाली नाहीत.

☞ राज्यात सन २०१५ मध्ये १ लाख लोकसंख्येमागे सर्वात कमी ६५ पोलीस कोल्हापूर ग्रामीण, ६७ पोलीस अहमदनगर, तर ७३ पोलीस सोलापूर या घटकात प्रत्यक्ष कार्यरत होते.

☞ सन २०१४ च्या तुलनेत सन २०१५ मध्ये भा.दं.वि. खालील गुन्ह्यांमध्ये १०.२३ टक्क्यांनी तर विशेष आणि स्थानिक कायद्याखालील गुन्ह्यांमध्ये ९.४७ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

☞ अपहरण व पळवून नेणे (या शीर्षात हरविलेल्या लहान मुलांचा समावेश केला आहे.) (+११७.६ टक्के), अनैसर्गिक संभोग (+५५.९ टक्के ), खंडणी (+२५.८टक्के), बलात्कार (+२०.५ टक्के), बेदरकारपणे व हयगयने वाहन चालवून मृत्यूस कारण होणे (+१९.६ टक्के), विनयभंग (+१७.१टक्के), जाळपोळ (+१०.१ टक्के) आणि चोरी (+८.६ टक्के) या गुन्हे शीर्षाखाली वाढ झालेली दिसते.

☞ सन २०१५ मध्ये मालमत्तेविरुद्धच्या गुन्ह्यांमध्ये २.४० टक्क्यांनी वाढ झाली आहे. मालमत्तेविरुद्धचे गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण ३२.६ टक्के असून मालमत्ता हस्तगत करण्याचे प्रमाण फक्त ५.१२ टक्के आहे. सन २०१५ मध्ये मालमत्तेच्या गुन्ह्यांमध्ये मालमत्ता हस्तगत करण्याचे प्रमाण दरोडा या गुन्हे शीर्षामध्ये सर्वात जास्त म्हणजे ३८.३१ टक्के आहे.

☞ मालमत्तेविरुद्धच्या गुन्ह्यांमध्ये चोरी या गुन्हे शीर्षाखाली सर्वात जास्त म्हणजे ५०२१९.८ लाख रुपयांची मालमत्ता चोरीस गेलेली आहे. तसेच आर्थिक गुन्ह्यांमध्ये (सामाजिक-आर्थिक गुन्हे) सन २०१४ तुलनेत सन २०१५ मध्ये (१६.६९) टक्के वाढ झाली आहे.

☞ सन २०१५ मध्ये स्त्रियांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यांमध्ये १६,५७ टक्के वाढ झाली आहे.

☞ अपहरण व पळवून नेणे (+१०७.४१ टक्के), कौटुंबिक हिंसाचार कायदा (+१०० टक्के), अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा (फक्त स्त्रिया) (+८८.६१ टक्के), बलात्कार (+२०.५ टक्के), विनयभंग (+१७.१२टक्के), व हुंडा प्रतिबंध अधिनियम (+७.६९ टक्के) या गुन्हे शीर्षात वाढ झाली आहे.

☞ अत्याचारांच्या एकूण गुन्ह्यांपैकी सर्वात जास्त गुन्हे (३७.६३ टक्के) विनयभंग या गुन्हे शीर्षाखाली नोंदविण्यात आले आहेत.

☞ बलात्कार या गुन्हे शीर्षाखालीही शिक्षा होण्याचे प्रमाण सन २०१४ मध्ये १९.१टक्के होते ते सन २०१५ मध्ये वाढ होऊन २१.१९ टक्के इतके झाले आहे.

☞ हिंसात्मक स्वरुपाच्या गुन्ह्यांमध्ये खून, खुनाचा प्रयत्न, सदोष मनुषवध, हुंडाबळी, अपहरण व पळवून नेणे, बलात्कार, जाळपोळ, दंगा, दरोडा व जबरी चोरी या गुन्ह्यांचा समावेश होतो. सन २०१५ मध्ये हिंसामय गुन्ह्यांत १४.४८ टक्के वाढ झाली आहे.

☞ हिंसात्मक स्वरुपाच्या गुन्ह्यांच्या प्रमाणामध्ये राज्यामध्ये ठाणे शहर (६०.२१), औरंगाबाद शहर (५२.२२), नागपूर शहर (५१.२२), नवी मुंबई (४२.१९), पुणे शहर (४२.१८), पुणे ग्रामीण (४१.०३), सोलापूर शहर (३९.९०) व मुंबई शहर (३८.८५) या घटकात झालेली लक्षणीय वाढ गुन्हे प्रतिबंधक यंत्रणांसाठी आव्हान ठरत आहे.

☞ अनुसूचित जातीच्या सदस्यांवरील अत्याचारांच्या गुन्ह्यांमध्ये सन २०१४ च्या तुलनेत सन २०१५ मध्ये (२.७१ टक्के) तर अनुसूचित जमातीच्या सदस्यांवरील अत्याचारांच्या गुन्ह्यांमध्ये (९.०३ टक्के) वाढ झाली आहे.

☞ अनुसूचित जातीच्या सदस्यांवरील गुन्हे शाबितीचे प्रमाण सन २०१४ मध्ये (७.५३ टक्के) होते ते सन २०१५ मध्ये (४.१ टक्के) इतके झाले आहे. तर अनुसूचित जमातीच्या सदस्यांवरील गुन्हे शाबितीचे प्रमाण सन २०१४ मध्ये (६.० टक्के) होते ते सन २०१५ मध्ये (२.३ टक्के) झाले आहे.

☞ विधिसंघर्षग्रस्त बालकांच्या (Juvenile)संख्येमध्ये सन २०१४ च्या तुलनेत सन २०१५ मध्ये (१.९६ टक्के)वाढ झाली असून सर्वात जास्त बाधित वयोगटातील मुले /मुली ही १६ ते १८ वयोगटातील आहेत.

☞ बालकांवरील अत्याचारांच्या गुन्ह्यांमध्ये सन २०१४ च्या तुलनेत सन २०१५ मध्ये (७१.५४ टक्के) वाढ झाली आहे.

☞ सन २०१५ मध्ये राज्यामध्ये रस्त्यावरील अपघातांमध्ये १३६८५ (म्हणजे दिवसाला ३७.४) व्यक्ती मृत्यू पावल्या असून ३९३०१ (म्हणजे दिवसाला १०८) व्यक्ती जखमी झाल्या आहेत.

# पाच वर्षांत १६२ कैद्यांचा मृत्यू

## कोठडीतील भयावह वास्तव

आरोपींच्या सुरक्षेची जबाबदारी पोलीस आणि तुरुंग प्रशासनाची असते; परंतु कोठडीत कैद्यांचे मृत्यू होतात. राज्यात पाच वर्षात तब्बल १६२ आरोपींचा कोठडीत मृत्यू झाला. उच्च न्यायालयात उघड झालेल्या आकडेवारीनंतर सरकारवर टीकेची झोड उठवण्यात आली.


उच्च न्यायालयात दाखल याचिकांत पोलीस कोठडीतील मृत्यू टाळण्यासाठी प्रत्येक ठाण्यात सीसीटीव्ही कॅमेरा लावण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पथदर्शी प्रकल्प म्हणून मुंबईतील २५ संवेदनशील पोलीस ठाण्यात कॅमेरे लावले जात आहेत.

## दहा वर्षांत चौकशी प्रक्रियाच नाही

फौजदारी दंडसंहितेनुसार आरोपीच्या संशयास्पद मृत्यूप्रकरणी पूर्वी जिल्हा दंडाधिकाऱ्यांमार्फत चौकशीची तरतूद होती. २००५ मधील कायदा दुरुस्तीनंतर दंडाधिकारी म्हणजे न्यायाधीशांमार्फत चौकशी होणे आवश्यक झाले. त्या दृष्टीने संशयास्पद मृत्यूची माहिती तात्काळ दंडाधिकाऱ्यांपर्यंत पोहोचविणे आणि त्यानंतर त्यांनी वैद्यकीय अधिकाऱ्याकडून मृतदेहाच्या तपासणीचा अहवाल मिळवून मृत्यूच्या कारणांचा शोध घेणे हे कायदेशीर चौकशीत अभिप्रेत आहे, मात्र राज्यात गेल्या दहा वर्षात अशी प्रक्रिया राबवली जात नसल्याचे न्यायालयात उघड झाले.

# गृह विभागाच्या अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा सुधारित अंदाज जास्त प्रत्यक्ष खर्च मात्र त्यापेक्षाही कमी

आलेख क्र. १ (रु. कोटीत)





| | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय अंदाज | ७२८६ | ८२९२ | १००९० | १२०४३ | १३३४१ | १४६०० | १५०९० | १७००७ |
| सुधारित अंदाज | ७६६० | ८५१६ | १०५५४ | १२१४० | १३३३४ | १५०३३ | १७३११ | |
| प्रत्यक्ष खर्च | ७०९६ | ७७८६ | ९५८३ | १०९७९ | ११७३८ | १३१११ | | |

*(स्रोत : अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका) वर्ष २०१६-१७ सुधारित अंदाज व वर्ष २०१७-१८ अर्थसंकल्पीय अंदाज)*

- ☞ वर्ष २०१०-११ ते वर्ष २०१७-१८ पर्यंत गृह विभागाला प्रत्यक्ष खर्चासाठी सुधारित अंदाजाच्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला नसल्याचे दिसते.
- ☞ वर्ष २०१४-१५ मध्ये अर्थसंकल्पीय अंदाज रु. १३,३४१ कोटी असून देखील त्यावर्षी निधी उपलब्ध होण्याचे प्रमाण मात्र सर्वात कमी म्हणजेच रु. ११,७३८ कोटी (८८ टक्के) आहे.
- ☞ वर्ष २०१०-११ ते वर्ष २०१७-१८ या कालावधीत गृह विभागाला सरासरी रु. १०,००० कोटी इतका निधी उपलब्ध झाल्याचे दिसते.
- ☞ वर्ष २०१७-१८ मध्ये अर्थसंकल्पीय अंदाज रु. १७,००७ कोटी आहे. वर्ष २०१६-१७ मधील सुधारित अंदाज रु.१७,३११ कोटी होता म्हणजे या अर्थसंकल्पात गृह विभागासाठी मागील वर्षाच्या सुधारित अंदाजापेक्षा रु. ३०४ कोटी इतका कमी निधी मिळाला आहे.

# राज्य अर्थसंकल्पाच्या १०० रुपयाच्या तुलनेत
# गृह विभागाला मिळतात फक्त ५.५० रुपये

आलेख क्र. २




| | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| टक्केवारी | ५.४१ | ५.५७ | ५.७९ | ५.८४ | ५.३९ | ५.८१ | ६.१२ | ५.६६ |

*(स्रोत : अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका, निव्वळ रकमा व खर्चाचा प्रधानशीर्षवार नि विभागवार सारांश व लोकलेखा)*
*वर्ष २०१६-१७ सुधारित अंदाज व वर्ष २०१७-१८ अर्थसंकल्पीय अंदाज)*

☞ वर्ष २०१०-११ ते वर्ष २०१५-१६ या काळात गृह विभागावर एकूण राज्य अर्थसंकल्पाच्या तुलनेत सरासरी ५.६३ टक्के एवढाच निधी उपलब्ध झाला.

☞ वर्ष २०१४-१५ मध्ये उपलब्ध निधी हा इतर वर्षांच्या तुलनेत कमी म्हणजेच ५.३९ टक्के दिसून येतो.

☞ वर्ष २०१३-१४ मध्ये गृह विभागाचे उपलब्ध निधीचे प्रमाण पाहता इतर वर्षाच्या तुलनेत जास्त म्हणजेच ५.८४ टक्के इतके होते.

☞ वर्ष २०१५-१६ मध्ये खर्चाचे प्रमाण ५.८१ टक्के असून, वर्ष २०१६-१७ मध्ये सुधारित अंदाजाचे प्रमाण हे ६.१२ टक्के आहे. परंतु तेवढा निधी उपलब्ध होणार नाही हे मागील अनुभवावरून सिध्द होते.

☞ वर्ष २०१७-१८ मध्ये अर्थसंकल्पीय अंदाज ५.६६ टक्के आहे.


# पोलीस

> *“पोलीस हा जनतेच्या अनादराचा, गुरुवर्यांच्या टीकेचा, चित्रपटात विनोदाचा - टिंगल - टवाळीचा विषय आहे. वर्तमानपत्रातून त्याला कधीही श्रेय मिळत नाही. सरकारी वकील आणि न्यायाधीश यांच्या सहकार्याअभावी तो निराधार असतो आणि आदरणीय व्यक्तींकडून त्याला तिरस्कार मिळतो, अनेकविध प्रलोभने आणि धोके सतत त्याच्यासमोर उभेच असतात. तो जेव्हा कायद्याचा अंमल करतो तेव्हा त्याचा धिक्कार होतो आणि जेव्हा अंमल करीत नाही तेव्हा तो निलंबित होतो. त्याच्याकडून सैनिकाची, शांतीदूताची आणि शिक्षकाची अपेक्षा करीत असताना त्याला पगार मात्र रोजंदार मजूरापेक्षा कमीच दिला जातो.”*
>
> **- ऑगस्ट वॉल्लीमोर.**

## मुंबईवरील वाढत्या दहशतवादातून आम्ही कोणता धडा घेतला?

आलेख क्र.३ (रु. कोटीत)

**पोलीस या मुख्य शीर्षावरील अंदाजित व प्रत्यक्ष खर्च**





| | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय अंदाज | ६११७ | ६६४० | ७८३३ | ९४२० | १०४६९ | ११८५३ | ११५७९ | १२७५२ |
| सुधारित अंदाज | ६३३० | ६७१९ | ८२११ | ९४२३ | १०३४३ | ११६३२ | १२४०४ | |
| प्रत्यक्ष खर्च | ५८०७ | ६१४२ | ७२९३ | ८२२९ | ८९१३ | ९९१६ | | |

*(स्त्रोत: खर्चाचा प्रधान शीर्षवार नि-विभागवार सारांश व लोकलेखा-मुख्य शीर्ष २०५५ व ४०५५ खालील २०१६-१७ सुधारित अंदाज व २०१७-१८ अंदाजित खर्च)*

- ☞ **वर्ष २०१०-११ ते वर्ष २०१७-१८ या कालावधीमध्ये पोलीस या मुख्य शीर्षासाठी शासनाने सुधारित अंदाजा इतका निधी उपलब्धच केला नसल्याचे दिसून येते.**
- ☞ **वर्ष २०१५-१६ मध्ये सुधारित अंदाज रु.११ हजार ६३२ कोटी असताना प्रत्यक्ष उपलब्ध झालेला निधी रु. १ हजार ७१६ कोटी इतका कमी होऊन त्या वर्षातील खर्च रु. ९ हजार ९१६ कोटी इतका झाला आहे.**
- ☞ **वर्ष २०१६-१७ चे सुधारित अंदाज रु. १२ हजार ३९३ कोटी व वर्ष २०१७-१८ मधील अर्थसंकल्पीय अंदाज रु. १२ हजार ७५२ कोटी इतके असले तरी हे अंदाज प्रत्यक्षात उतरणे महत्त्वाचे ठरेल.**

# राज्याचा पोलिसांसाठी सरासरी उपलब्ध निधी फक्त ४.३० टक्के

आलेख क्र. ४




*(स्रोत : खर्चाचा प्रधान शीर्षवार-नि-विभागवार सारांश व लोकलेखा - मुख्य शीर्ष २०५५ व ४०५५ खालील अंदाजित व प्रत्यक्ष खर्च) वर्ष २०१६-१७चे सु. अंदाज व वर्ष २०१७-१८चे अर्थसंकल्पीय अंदाज)*

- वर्ष २०१०-११ ते वर्ष २०१५-१६ या कालावधीत राज्याच्या उपलब्ध निधीच्या तुलनेत पोलीस या शीर्षावरील उपलब्ध होणारा निधीचे सरासरी प्रमाण हे फक्त ४.३० टक्के दिसून येते.
- वर्ष २०१४-१५ च्या तुलनेत वर्ष २०१५-१६ मध्ये उपलब्ध झालेला निधी ०.३१ टक्क्यांनी वाढला आहे.

## पोलीस कोठडी की, मृत्यूचे सापळे?

पोलीस कोठडीत वर्ष २००८ ते २०१५ या ८ वर्षाच्या दरम्यान २५५ संशयित आरोपींचा मृत्यू झाला आहे. वर्ष २०१५ च्या ऑक्टोबर अखेरपर्यंत ३१ जणांनी कोठडीत अखेरचा श्वास घेतला आहे. या कोठडीतील संशयीत मृत्यूंचा छडा लावण्याची जबाबदारी सी.आय.डी.कडे देण्यात येते. मात्र त्यांच्या तपासातील कासवगतीमुळे बहुतांश प्रकरणांचा तपास प्रलंबित असल्याची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली आहे. पोलीस कोठडीत संशयीत आरोपींच्या मृत्युचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले असून यापुढे कोठडीत एकही मृत्यू नको असे मुंबई हाय कोर्टाने बजावूनही कोठडीतील मृत्यूचे प्रमाण वाढतेच राहिले आहे. याबाबत न्यायालयाने पोलीस कोठडीत होणाऱ्या मृत्यूबाबत सरकारने पोलीस अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई केल्यास राज्यातील प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये योग्य संदेश जाईल आणि कोठडीत होणाऱ्या मृत्यूला आळा बसेल. यापुढे एकही कोठडीतील मृत्यू नको असे उच्च न्यायालयाने ठणकावले आहे.

# राज्याचा गृह विभागावरील व पोलीस या मुख्य शीर्षावरील खर्चातील फरक

तक्ता क्र.१ (रु. कोटीत)

| वर्ष | गृह विभागावरील खर्च | पोलीस शीर्षावरील खर्च | टक्केवारी |
|---|---|---|---|
| २०१०-११ | ७,०९६ | ५,८०७ | ८१.८३ |
| २०११-१२ | ७,७८६ | ६,१४२ | ७८.८८ |
| २०१२-१३ | ९,५८३ | ७,२४८ | ७६.१० |
| २०१३-१४ | १०,९७९ | ८,२२९ | ७४.९५ |
| २०१४-१५ | ११,७३८ | ८,९१३ | ७५.९३ |
| २०१५-१६ (प्र) | १३,१११ | ९,९१६ | ७५.६३ |
| २०१६-१७(सु.अं) | १७,१११ | १२,४०४ | ७१.६५ |
| २०१७-१८ (अ. अं) | १७,००७ | १२,७५२ | ७४.९८ |

*स्रोत : अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका व खर्चाचा प्रधान शीर्षवार-नि-विभागवार सारांश व लोकलेखा - मुख्य शीर्ष २०५५ व ४०५५ खालील अंदाजित व प्रत्यक्ष खर्च*

- **वर्ष २०१०-११ ते वर्ष २०१५-१६ या कालावधीतील गृह विभागावरील एकूण खर्चाच्या तुलनेत पोलीस या शीर्षावरील खर्चाचे सरासरी प्रमाण ७६.७१ टक्के आहे म्हणजेच उर्वरित २३.३९ टक्के खर्च हा तुरुंग, परिवहन, राज्य उत्पादन शुल्क आणि सर्वसाधारण (न्यायदान, होमगार्ड, नागरी संरक्षण, नागरिकत्व आणि राज्य मानवी हक्क आयोग) यावर केला होता.**
- **वर्ष २०१०-११ ते वर्ष २०१५-१६ पर्यंत पोलीस या शीर्षावर सरासरी रु.७ हजार ७०९ कोटी निधी उपलब्ध झाला.**
- **वर्ष २०१४-१५शी तुलना करता वर्ष २०१५-१६ मध्ये गृह विभागाला उपलब्ध झालेल्या निधीत १००३ कोटीत वाढ झाल्याचे दिसते.**

### *पोलिसांवरील वाढता ताण : महाराष्ट्रात १ लाख लोकसंख्येमागे केवळ १६८ पोलीस*

**महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या ११ कोटी ९१ लाख एवढी असून २०१५ पर्यंतच्या आकडेवारीनुसार राज्यात प्रत्यक्ष पोलीस संख्याबळ १ लाख ९९ हजार ९३९ आहे. म्हणजेच एक लाख लोकसंख्येसाठी १६८ पोलीस आहेत. तर एक लाख लोकसंख्येमागे सर्वात कमी ६५ पोलीस कोल्हापूर, ६७ पोलीस अहमदनगर, तर ७३ पोलीस सोलापूर ग्रामीण या घटकात प्रत्यक्ष कार्यरत होते.**

*- स्रोत : महाराष्ट्रातील गुन्हे २०१५*

### महाराष्ट्र राज्यात महिला पोलिसांचे प्रमाण नगण्य

**राज्यात २ लाख २० हजार १२६ पोलीस कार्यरत असून त्यापैकी महिलांची संख्या २६ हजार १५४ इतकी आहे. एकूण पोलीसांच्या प्रमाणात ११.८८% इतके कमी आहे. राज्यात महिलांची संख्या ५ कोटी ८७ लाख ६० हजार असून त्या प्रमाणात महिलांची भरती पोलीस विभागात होणे गरजेचे आहे.**

*-माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती २०१७ व आर्थिक पाहणी २०१६-१७*

# गुन्हे - राज्यभरात १ लाख ६७ हजार गुन्हे प्रलंबित

तक्ता क्र. २

## गुन्ह्याची निर्गती करण्यात गृह विभागाला अपयश

| अक्र | गुन्ह्याचा प्रकार | आधीचे प्रलंबित गुन्हे | इतर पोलीस ठाण्यात बदली झालेले गुन्हे | एकूण गुन्हे | तपास न लागलेले गुन्हे | तपासकार्य पूर्ण झालेले एकूण गुन्हे | वर्षअखेर तपासासाठी प्रलंबित राहिलेले गुन्हे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | खून | १३०९ | ६ | ३८१२ | ० | २५४३ | १२६९ |
| २) | खुनाचा प्रयत्न | १५४१ | १ | ४२२३ | १ | २५५१ | १६७२ |
| ३) | सदोष मनुष्यवध | १३० | १ | २८० | ० | १५१ | १२९ |
| ४) | सदोष मनुष्यवधाचा प्रयत्न | ९ | ० | २१ | १ | १६ | ५ |
| ५) | बलात्कार | १५०७ | १२ | ५६१९ | ० | ३५७५ | २०६४ |
| ६) | बलात्काराचा प्रयत्न | ७ | ० | २० | ० | १८ | २ |
| ७) | पळवून नेणे व अपहरण | २७५० | ६ | १०९९९ | १ | ६०४५ | ४९५४ |
| ८) | दरोडा | ५८९ | १ | १३७२ | १ | ८०९ | ५६३ |
| ९) | दरोड्यासाठी तयारी करणे एकत्र येणे | १८३ | २ | ४५६ | ० | २७६ | १८० |
| १०) | जबरी चोरी | ५७६३ | २ | १४३२२ | ० | ८७७६ | ५५४६ |
| ११) | घरफोडी | ११७५५ | ० | २८३३६ | ० | १६१६६ | १२१७० |
| १२) | चोरी | ४१५७९ | ५ | १०२६६६ | २ | ५७०१६ | ४५६५० |
| १३) | बेकायदेशीरपणे एकत्र येणे | ५७६ | ० | १४८५ | ० | ९०१ | ५८४ |
| १४) | गर्दी - मारामारी (दंगल) | ३७२९ | १ | १२०६३ | २ | ७३३१ | ४७३२ |
| १५) | अन्यायाने विश्वासघात | ३३१० | २० | ५३२९ | ० | १७३३ | ३५९६ |
| १६) | फसवणूक | १३१४६ | ३६ | २३५९३ | ० | ८९४७ | १४६४६ |
| १७) | बनावट नाणी/नोटा | १०७८ | १३ | २०७५ | ० | ५७० | १५०५ |
| १८) | जाळपोळ | ६१२ | ० | १९११ | ० | ११८१ | ७३० |
| १९) | दुखापत | ५१८७ | ० | १३१२८ | ० | ७५९० | ५५३८ |
| २०) | हुंडाबळी | ११० | ० | ३७८ | ० | २६० | ११८ |
| २१) | विनयभंग | १०१६ | १ | २११३४ | ० | ९७७८ | १०३६ |
| २२) | छेडछाड (लैंगिक छळ) | ४२३७ | ३ | १५९४५ | ० | १०९८ | ६१६७ |
| २३) | पती किंवा नातेवाईकांकडून छळ | ३०९१ | ३ | १०७२३ | १ | ६७९३ | ३९३० |
| २४) | निष्काळजीपणामुळे मृत्यू | ४७२४ | ० | १७७७८ | ० | १२२२८ | ५५५० |
| २५) | खंडणी | ४५१ | १२ | १४१९ | ० | ७४१ | ६७८ |
| २६) | मोटार अपघात | ९४०५ | ० | ४०५६४ | ० | २८१९७ | १२३६७ |
| २७) | मानवी तस्करी | ७७ | ० | ८४ | ० | ३२ | ५२ |
| २८) | इतर भा. दं. वि. गुन्हे | २६६१८ | १७ | ९८५५३ | १ | ६६१७१ | ३२३८२ |
| | **एकूण भा. दं. वि. खाली दखलपात्र गुन्हे** | **१४४४८९** | **१४२** | **४१९२८८** | **१०** | **२५१४९३** | **१६७८१५** |

*(स्त्रोत: महाराष्ट्रातील गुन्हे - २०१५)*

☞ **वर्ष २०१५ मध्ये ४ लाख १९ हजार २८८ गुन्हे तपासासाठी होते. त्यामध्ये मागील प्रलंबित गुन्ह्यांची संख्या १ लाख ४४ हजार ४८९ (३४%) एवढी प्रचंड होती. त्यापैकी केवळ १० गुन्ह्यांचा तपास लागला नाही तर २ लाख ५१ हजार ४९३ (५९.९८%) गुन्ह्याचे तपासकार्य पूर्ण झाले तसेच वर्षाखेरीस १ लाख ६७ हजार ३१५ (४०.०२%) गुन्हे पुन्हा वर्षाखेरीस प्रलंबित राहिले आहेत.**

☞ **प्रलंबित गुन्ह्याचे प्रमाण दरवर्षी सातत्याने वाढत असून हे प्रमाण कमी करण्यासाठी पोलिसांची व अधिकाऱ्यांचे संख्याबळ वाढवावे लागेल तसेच त्यांचे आधुनिकीकरण करावे लागेल.**

☞ **चोरीचे प्रमाण सातत्याने वाढत असून २०१५ मध्ये चोरीची ५७ हजार १६ प्रकरणे घडली त्यापैकी ४५ हजार ६५० (८०%) प्रकरणे प्रलंबित असून केवळ ११ हजार ४१६ (२०%) प्रकरणांचा छडा लावण्यात शासनाला यश आले.**

# ९ प्रमुख शहरात १ लाख ८ हजार गुन्हे घडले

## मागील वर्षाच्या तुलनेत गुन्हेगारी ९ टक्के वाढली

तक्ता क्र. ३

| अक्र | प्रमुख शहरे | २०१० | २०११ | २०१२ | २०१३ | २०१४ | पंचवार्षिक सरासरी २०१०-१४ | २०१५ | २०१५ची टक्केवारी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | सरासरी | २०१४ |
| १. | नागपूर शहर | ७७२८ | ८०६३ | ८२७७ | ९४२६ | १०३५९ | ८७७१ | ११०१८ | २५.६ | १६.९ |
| २. | पुणे शहर | १३६०२ | १२६२२ | १२३०८ | १३१५९ | १४४६८ | १३२३२ | १५३४९ | १६.० | १६.६ |
| ३. | ठाणे शहर | ९९४३ | ९६५३ | १०१४४ | १२६३१ | १३२२७ | ११११२० | १५२०४ | ३६.७ | २०.४ |
| ४. | मुंबई शहर | ३३९३२ | ३२६४७ | ३०५०८ | ३४८४० | ४०३६१ | ३४४५८ | ४२९४० | २४.६ | २३.२ |
| ५. | नाशिक शहर | ४४८४ | ४५१२ | ४३९० | ४४०१ | ३८८३ | ४३३४ | ३९६३ | -८.६ | -१०.० |
| ६. | औरंगाबाद शहर | ३९५३ | ३७८१ | ३६५९ | ४०३३ | ४८२१ | ४०४९ | ७०५१ | ७४.१ | ७४.८ |
| ७. | सोलापूर शहर | १६२३ | १९६५ | १९९२ | २१६६ | २१८६ | १९८६ | २५८३ | ३०.० | १९.३ |
| ८. | नवी मुंबई | ५८७३ | ५६५८ | ५१५७ | ५३९० | ५९०३ | ५५९६ | ५९९० | ७.० | ११.१ |
| ९. | अमरावती शहर | ३०७९ | २९३१ | २७१३ | २७७६ | ३३३८ | २९६७ | ४४८८ | ५१.२ | ६१.७ |
| | **एकूण** | **८४२१७** | **८१८३२** | **७९१४८** | **८८८२२** | **९८५४६** | **८६५१३** | **१०८५८६** | **२५.५** | **२२.३** |

*(स्त्रोत :महाराष्ट्रातील गुन्हे २०१५)*

- ☞ **राज्यातील नागपूर, पुणे, ठाणे, मुंबई, नाशिक, औरंगाबाद, सोलापूर, नवी मुंबई व अमरावती या ९ शहरात १ लाख ८ हजार ५८६ गुन्हे घडले. वर्ष २०१४च्या तुलनेत २०१५ मध्ये गुन्ह्याचे प्रमाण ९.२४ टक्के वाढले आहे.**
- ☞ **मुंबई शहरामध्ये ४२ हजार ९४० गुन्हे घडले असून एकूण ९ शहराच्या प्रमाणात ही संख्या ३९.५४ टक्के आहे.**
- ☞ **सोलापूर शहरात २ हजार ५९३ गुन्हे घडले असून ९ शहरातील एकूण गुन्ह्यांशी तुलना करता हे प्रमाण केवळ २.३७ टक्के आहे.**

# अनुसूचित जातीवरील अत्याचाराचे गुन्हे १ हजार ७६८

## अनुसूचित जाती व जमातींच्या नागरिकांवरील अत्याचाराचे प्रमाण वाढले

तक्ता क्र. ४

| गुन्ह्याचा प्रकार | वर्ष | | | | | | २०१० शी २०१५ची % | २०१४शी २०१५ची % | २०१५ टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०१० | २०११ | २०१२ | २०१३ | २०१४ | २०१५ | | | |
| खून | २४ | २६ | ३६ | ४० | ४३ | ४२ | ७५.०० | -२.३२ | २.३१ |
| बलात्कार | ८९ | ९५ | ९७ | १७९ | १७९ | २३८ | १६७.४२ | ३२.९६ | १३.११ |
| अपहरण व पळवून नेणे | २५ | १२ | २३ | ३३ | ३७ | ३४ | ३६.०० | -८.११ | १.८७ |
| दरोडा | २२ | १६ | १६ | २६ | २० | १९ | -१३.६४ | -५.०० | १.०५ |
| जबरी चोरी | २० | १२ | १३ | २२ | १८ | १९ | ५.०० | ५.५६ | १.०५ |
| जाळपोळ | १२ | ७ | ९ | १० | ११ | ११ | -८.३३ | ०.०० | ०.६१ |
| दुखापत | ७७ | ८४ | ८१ | १६७ | २६ | ३५ | -५४.५४ | ३४.६१ | १.६३ |
| नागरी हक्क संरक्षण कायदा | २५ | १० | ५ | २१ | ५ | ९ | -६७.८६ | ८०.०० | ०.५० |
| अनु. जाती/ जमाती प्रतिबंधक कायदा | ३१९ | ३०४ | २६७ | २७७ | ३२९ | २९० | -९.०९ | -११.८५ | १५.९७ |
| इतर गुन्हे | ५१९ | ५७७ | ५४४ | ९०३ | ४७५ | ४३४ | -१६.३८ | -८.६३ | २३.९० |
| **एकूण** | **११३२** | **११४३** | **१०९१** | **१६७८** | **११४३** | **११३१** | **११३.५८** | **११२.२२** | **६२.००** |

*(स्त्रोत: महाराष्ट्रातील गुन्हे -२०१५)*

☞ **वर्ष २०१५-१६मध्ये १,१३१ गुन्हे घडले असून वर्ष २०१० च्या तुलनेत केवळ १ ने घटली आहे. तर २०१४-१५ च्या तुलनेत १२ ने कमी झाले आहेत.**

☞ **मात्र बलात्काराच्या संख्येत मागील ५ वर्षात मोठी वाढ झाली असून २०१० मध्ये ८९, २०१४ मध्ये १७९ तर २०१५ मध्ये २३८ बलात्काराचे गुन्हे घडले आहेत.**

☞ **अनुसूचित जाती -जमाती प्रतिबंधक कायद्याअंतर्गत वर्ष २०१५ मध्ये २९० गुन्हे दाखल झाले आहेत.**

☞ **अनुसूचित जातीतील व्यक्तींचे अपहरण करणे व पळवून नेण्याचे प्रमाण सातत्याने वाढत असून वर्ष २०१४ मध्ये ३७ तर २०१५ मध्ये ३४ गुन्हे घडले आहेत.**

# अनुसूचित जमातींवरील अत्याचारांचे ४८३ गुन्हे दाखल

## बलात्काराची प्रकरणे पोहोचली ८६वर

तक्ता क्र. ५

### अनुसूचित जमातीवरील अत्याचाराचे गुन्हे

| गुन्ह्याचा प्रकार | वर्ष | | | | | | २०१० शी २०१५ची % | २०१४शी २०१५ची % | २०१५ टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०१० | २०११ | २०१२ | २०१३ | २०१४ | २०१५ | | | |
| खून | ९ | १६ | ११ | ११ | २० | ११ | २२.२२ | -४५.०० | २.२८ |
| बलात्कार | ४६ | ५७ | ५६ | ९१ | ८६ | ८६ | ८६.९५ | ०.०० | १७.८१ |
| अपहरण व पळवून नेणे | ८ | ११ | ७ | ९ | ८ | १० | २५.०० | २५.०० | २.०७ |
| दरोडा | १ | ३ | ४ | ६ | ० | २ | १००.०० | २००.०० | ०.४१ |
| जबरी चोरी | १ | २ | ३ | २ | ५ | १ | ०.०० | -८०.०० | ०.२१ |
| जाळपोळ | ७ | ४ | १ | ५ | ४ | २ | -७१.४३ | -५०.०० | ०.४१ |
| दुखापत | ११ | १८ | १७ | २९ | १० | ९ | -१८.१८ | -१०.०० | १.८६ |
| नागरी हक्क संरक्षण कायदा | ० | ० | १ | १ | ९ | १ | ०.०० | -८८.८९ | ०.२१ |
| अनु. जाती/ जमाती प्रतिबंधक कायदा | ५५ | ६१ | ५३ | ४५ | ५५ | १०० | ८१.८१ | ८१.८२ | २०.७० |
| इतर गुन्हे | १५४ | १४९ | १५५ | २१३ | ८६ | ८१ | -४७.४० | -५.८१ | १६.७७ |
| **एकूण** | **२९२** | **३२१** | **३०८** | **४१५** | **४४३** | **४८३** | **६५.४१** | **९.०३** | **१००.००** |

*(स्त्रोत: महाराष्ट्रातील गुन्हे -२०१५)*

☞ **वर्ष २०१० मध्ये अनुसूचित जमातीवर अत्याचाराचे २९२ गुन्हे घडले होते. त्यात गेल्या ५ वर्षात १९१ ने वाढ झाली असून वर्ष २०१५ मध्ये ४८३ गुन्हे दखल झाले आहेत.**


☞ **वर्ष २०१४ व २०१५ मध्ये अनुसूचित जमातीच्या स्त्रियांवर बलात्काराची ८६ प्रकरणे घडली.**

☞ **अनुसूचित जाती-जमाती प्रतिबंधक कायदव्याअंतर्गत १०० प्रकरणे दाखल आहेत. जी २०१४ मध्ये ५५ प्रकरणे होती म्हणजे एका वर्षात ४५ प्रकरणे वाढली आहेत**

☞ **अपहरण व पळवून नेण्याचे प्रकारही वाढले असून वर्ष २०१४ मध्ये ८ तर २०१५ मध्ये १० प्रकरणे दाखल झाली आहेत.**

# राज्यात १३ हजार ९४४ अल्पवयीन मुलांवर अत्याचाराचे दाखल गुन्हे

आलेख क्र. ५




*(स्त्रोत:महाराष्ट्रातील गुन्हे -२०१५)*

☞ अल्पवयीन मुलांवरील अत्याचारांच्या गुन्ह्यात सातत्याने वाढ होत असून संपूर्ण राज्यात १३ हजार ९४४ गुन्हे घडले आहेत.


☞ अल्पवयीन मुलांवरील अत्याचारात मुंबई शहर हे क्रमांक एकवर असून एकूण राज्यातील अल्पवयीन मुलांवरील अत्याचारात मुंबई शहराचे प्रमाण २२.८५टक्के आहे.

☞ पुणे शहर अल्पवयीन मुलांवरील अत्याचारात क्रमांक दोनवर असून, ठाणे शहर क्रमांक तीनवर आहे तर नागपूर चवथ्या क्रमांकावर आहे.

☞ पुणे शहरात १,०९५, ठाणे शहर १,०६६ व नागपूर शहरात ६९३ अल्पवयीन मुलांवरील अत्याचाराचे गुन्हे घडले आहेत.

# अल्पवयीन बालिकांवरील बलात्कार आणि अपहरणाचे गुन्हे

आलेख क्र. ६




*(स्त्रोत:महाराष्ट्रातील गुन्हे -२०१५)*

☞ राज्यामध्ये बालकांवरील बलात्काराचे गुन्हे सातत्याने वाढत असून वर्ष २०११ ते २०१५ या ५ वर्षाच्या कालावधीत ७ हजार २२६ गुन्हे घडले आहेत.

☞ राज्यामध्ये बालकांच्या अपहरणाच्या गुन्ह्यांचे प्रमाणही सातत्याने वाढत असून वर्ष २०११ ते २०१५या ५ वर्षाच्या कालावधीत १३ हजार २५ गुन्हे घडले.

☞ बालकांच्या अपहरणाच्या गुन्ह्यात २०१५ मध्ये प्रचंड वाढ झाली असून यावर्षी ६ हजार ९६० अपहरणाचे गुन्हे घडले आहेत. हे प्रमाण वर्ष २०१४ च्या तुलनेत ४ हजार ३४४ ने अधिक आहे.

# पोलिसांविरुध्दच ८ हजार ४ तक्रारी

## सर्वसामान्य जनता हतबल!

तक्ता क्र. ६

| वर्ष | पोलिसांविरुध्द तक्रारी | खातेनिहाय चौकशी | दंडाधिकाऱ्या मार्फत चौकशी | न्यायालयीन चौकशी | खोट्या तक्रारी/निराधार आरोप | दाखल गुन्हे | न्यायालयात पाठविलेले दोषारोप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१२ | ६९२५ | ३९८ | १४ | ६५ | ४५४९ | ३८० | १७३ |
| २०१३ | ७२८० | ९५१ | १ | ८६ | ४१७२ | ४४२ | १७२ |
| २०१४ | ६५२८ | ७२७ | ८ | ६० | २३५५ | ४८७ | १६७ |
| २०१५ | ८००४ | ९३४ | ९ | २२ | ३९६२ | ५३६ | १९१ |

*(स्त्रोत:महाराष्ट्रातील गुन्हे -२०१५)*

☞ **पोलिसांविरुध्दच्या तक्रारी सातत्याने वाढत असून वर्ष २०१५ मध्ये मागील ४ वर्षात सर्वात जास्त म्हणजे ८ हजार ४ तक्रारी दाखल झाल्या त्यापैकी ५३६ प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.**

☞ **२२ पोलिसांची न्यायालयीन चौकशी करण्यात आली असून ९३४ पोलिसांची खातेनिहाय चौकशी करण्यात आली.**

☞ **वर्ष २०१५ मध्ये पोलिसांविरुद्ध ३ हजार ९६२ खोट्या व निराधार तक्रारी करण्यात आल्या होत्या.**

# राज्यात १ लाख २० हजार ४४७ पोलीस शासकीय निवासापासून वंचित

## महाराष्ट्र राज्य पोलीस संख्याबळ आणि त्यांना उपलब्ध झालेली शासकीय निवासस्थाने

तक्ता क्र.७

| ३१ जानेवारी, २०१६ पर्यंत | | | | |
|---|---|---|---|---|
| पद | कार्यरत संख्याबळ | उपलब्ध निवासस्थाने | निवासस्थान नसलेले | निवासस्थान नसलेल्यांची टक्केवारी |
| पोलीस अधिकारी | १७०९० | ५६६५ | ११४२५ | ६६.८५ |
| पोलीस कर्मचारी | १८९८७२ | ८०८५० | १०९०२२ | ५७.४१ |
| **एकूण** | **२०६९६२** | **८६५१५** | **१२०४४७** | **५८.१९** |

*स्त्रोत: माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती, ८ मार्च, २०१६*

☞ **महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालयातून प्राप्त झालेल्या माहितीनुसार राज्यात २ लाख ६ हजार ९६२ एवढी पोलिसांची संख्या असून त्यापैकी केवळ ८६ हजार ५१५ (४१.८०%) अधिकारी व कर्मचाऱ्यांकडे शासकीय निवासस्थाने आहेत तर १ लाख २० हजार ४४७ पोलीस निवासस्थानांपासून वंचित आहेत.**

☞ **राज्यातील १७ हजार ९० अधिकाऱ्यांपैकी केवळ ५ हजार ६६५ अधिकाऱ्यांना शासन निवासस्थाने देऊ शकले याचा अर्थ आजही ६६.८५% अधिकारी हे शासकीय निवासस्थानांपासून वंचित आहेत.**

☞ **राज्यातील पोलीस कर्मचाऱ्यांची संख्या १ लाख ८९ हजार ८७२ आहे. त्यापैकी केवळ ८० हजार ८५० पोलीस कर्मचाऱ्यांना शासन निवासस्थान उपलब्ध करून देऊ शकले. तर आजही १ लाख ९ हजार २२ पोलीस कर्मचाऱ्यांना निवासस्थाने उपलब्ध नाहीत.**

# २८ हजार ९९५ मुंबई-पोलीस आजही घरांच्या प्रतिक्षेत

## मुंबई पोलीस आयुक्तालयातील प्रत्यक्ष संख्याबळ व त्यांना उपलब्ध झालेली निवासस्थाने

तक्ता क्र.८

| मार्च, २०१७ पर्यंत | | | | |
|---|---|---|---|---|
| पद | प्रत्यक्ष संख्याबळ | उपलब्ध निवासस्थाने | निवासस्थान नसलेले | निवासस्थान नसलेल्यांची टक्केवारी |
| पोलीस अधिकारी | ४,८३५ | २,१९९ | २,६३६ | ५४.५१ |
| पोलीस कर्मचारी | ३९,५९१ | १९,४४२ | २०,१४९ | ५०.८९ |
| **एकूण** | ४४,४२६ | २१,६४१ | २२,७८५ | ५१.२८ |

*स्त्रोत: माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती, मार्च, २०१७*

☞ मुंबई पोलीस आयुक्तालयातून प्राप्त झालेल्या माहितीनुसार मुंबई पोलिसांचे प्रत्यक्ष संख्याबळ ४४ हजार ४२६ आहे. त्यामध्ये ४ हजार ८३५ पोलीस अधिकारी व ३९ हजार ५९१ पोलीस कर्मचारी आहेत.

☞ राज्यात २० हजार १४९ (५०.८९%) पोलीस कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी शासकीय निवासस्थाने उपलब्ध नसून २ हजार ६३६ (५४.५१%) पोलीस अधिकाऱ्यांना निवासस्थाने नाहीत.

## पोलिसांची १२ हजार पदे रिक्त, अपुऱ्या पोलिसांमुळे मुंबईसह राज्य असुरक्षित

राज्यातील पोलिसांचे एकूण मंजूर संख्याबळ २ लाख २० हजार इतकी पदे मंजूर असून त्यापैकी ११ हजार ९९२ पदे रिक्त असल्याचे वास्तव समोर आले आहे. अपुऱ्या मनुष्यबळामुळे पोलिसांवर कामाचा ताण येत आहे. पोलीस दलातील अपुरे मनुष्यबळ, हुषार तपास अधिकाऱ्यांची कमतरता यामुळे मुंबई शहर वर्षागणिक सुरक्षित होत असल्याचा निष्कर्ष प्रजा फाऊंडेशनने पोलिसिंग, कायदा व सुव्यवस्थेसंबंधात काढलेल्या अहवालात म्हटले आहे. दक्षिण मध्य मुंबईतच सर्वाधिक गुन्ह्यांची नोंद झाली असून या परिसरातील ३६ टक्के नागरिकांना मुंबईत सुरक्षित वाटत नाही. गेल्या ५ वर्षात बलात्कार आणि विनयभंगाच्या तक्रारी नोंदविण्याचे प्रमाण वाढले असून तपास अधिकाऱ्यांच्या कमतरतेमुळे गुन्हेसिध्दीचे प्रमाण घटले आहे. तसेच सामान्य नागरिकांच्या तक्रारी ऐकण्यासाठी असलेल्या पोलीस नियंत्रण कक्षात ५१ टक्के पदे रिक्त असल्याचे धक्कादायक वास्तव उघडकीस आले आहे.

## कैद्यांना सुविधा पुरवा!
## मुंबई उच्च न्यायालयाचे राज्य सरकारला आदेश

**राज्यभरातील तुरुंगात असलेल्या हजारो कैद्यांच्या आरोग्यबाबत जिल्हावार आहारतज्ज्ञांनी पूर्वसूचना न देता आकस्मिक करावयाची आहे, असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिले.**

# कारागृह-राज्यात ५ हजार १५८ बंदी अतिरिक्त

तक्ता क्र. ९

**कारागृहनिहाय सरासरी बंदी संख्येची अधिकृत बंदी क्षमतेशी टक्केवारी सन २०१५-१६**

| कारागृहाचे नाव | अधिकृत बंदी | | | सरासरी बंदी २०१५-१६ | | | अधिकृत बंदी क्षमतेशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण | पुरुष | स्त्री | एकूण | |
| अ) मध्यवर्ती कारागृह | | | | | | | |
| येरवडा, पुणे | २३२३ | १२६ | २४४९ | ३७८० | २५८ | ४०३८ | १६५ |
| कोल्हापूर, कळंबा | १७५५ | ३४ | १७८९ | १५३३ | ४२ | १५७५ | ८८ |
| मुंबई | ८०४ | ० | ८०४ | २७०२ | ० | २७०२ | ३३६ |
| ठाणे | १०८० | २५ | ११०५ | २६८० | ८५ | २७६५ | २५० |
| औरंगाबाद | ५४८ | ३१ | ५७९ | ११५१ | ९१ | १२४२ | २१५ |
| नाशिक रोड | ३११८ | ६० | ३१७८ | २६४० | ९९ | २७३९ | ८६ |
| नागपूर | १६९८ | १४२ | १८४० | १९०८ | ६० | १९६८ | १०७ |
| अमरावती | ९३९ | ३४ | ९७३ | १०६० | ५२ | १११२ | ११४ |
| तळोजा | २१२४ | ० | २१२४ | १८८० | ० | १८८० | ८९ |
| **एकूण** | **१४३८९** | **४५२** | **१४८४१** | **१९३३४** | **६८७** | **२००२१** | **१३५** |
| **ब) जिल्हा कारागृह वर्ग -१** | **५८६१** | **१२९** | **५९९०** | **४९७२** | **१९८** | **५१७०** | **८६** |
| **क) जिल्हा कारागृह वर्ग -२** | **२३५७** | **५४९** | **२९०६** | **३२७४** | **४६५** | **३७३९** | **२७८९** |
| **ड) जिल्हा कारागृह वर्ग -३** | **१८४** | **२१** | **२०५** | **१६२** | **८** | **१७०** | **८३** |
| **एकूण** | **२२७११** | **११५१** | **२३९४२** | **२७७४२** | **१३५८** | **२९१००** | **१२२** |

*(स्रोत : माहितीचा अधिकाराखाली प्राप्त - मार्च, २०१७)*

☞ **वर्ष २०१५-१६ मध्ये मध्यवर्ती कारागृह, जिल्हा कारागृह-१ जिल्हा कारागृह-२ व जिल्हा कारागृह-३ यांची एकत्रित बंदी क्षमता २३ हजार ९४२ इतकी होती. त्यामध्ये १ हजार १५१ महिला बंदींसाठी जागा होती. मात्र या कालावधीत २९ हजार १०० बंदी ठेवण्यात आले होते. त्यात १ हजार ३५८ स्त्री बंदी होत्या. म्हणजे उपलब्ध क्षमतेपेक्षा २२ टक्के अधिक बंदी कारागृहात ठेवण्यात आले होते. हे एकाप्रकारे मानवी हक्कांचा भंगच म्हणावा लागेल.**

☞ **येरवडा, पुणे येथे अधिकृत बंदी क्षमता २,४४९ असून ४,०३८ बंदी कोंबले होते. म्हणजे १५८९ (६५ टक्के) अधिकचे कैदी कारागृहात होते. तर मुंबईच्या कारागृहात अधिकृत क्षमता ८०४ होती मात्र या कारागृहात २,७०२ कैदी कोंबले होते. १,८९८ हे अधिकचे कैदी होते.**

## अतिरिक्त तुरुंग उभारा - उच्च न्यायालयाचा राज्य सरकारला आदेश

**मुंबई व पुण्यासह राज्यभरातील तुरुंगामध्ये क्षमतेपेक्षा जास्त कैदी असल्याने आणि तुरुंगाची स्थिती समाधानकारक नसल्याने त्याविषयी चिंता व्यक्त करतानाच मुंबई व पुण्यात अतिरिक्त तुरुंगांची उभारणी करण्याकरिता राज्य सरकारने तीन महिन्यांच्या आत योग्य ती पावले उचलावीत, असा आदेश मुंबई उच्च न्यायालयाने नुकताच दिला.**